**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, २६६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

जा.क्र.ससं/उशि/पुवि/शिष्य २०१९-२०/२०२०/2955 दिनांक १२.१०.२०२०.

**तात्काळ/महत्वाचे/ईमेलद्वारे**

प्रति,

१. प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित /कायम विना अनुदानित कला, वाणिज्य,विज्ञान, विधी, शारीरिक शिक्षण व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हे.**
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ७.
३. कुलसचिव, डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संस्था, येरवडा, पुणे – ६
४. कुलसचिव, गोखले इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटिक्स, पुणे.
५. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
६. कुलसचिव, भारती विद्यापीठ, पुणे.
७. कुलसचिव, सर्व खाजगी विद्यापीठे, पुणे/अहमदनगर व नाशिक

विषय - **महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे त्वरीत वितरणाबाबत..**

संदर्भ - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा.पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य २०१९-२०/डीबीटी/६६२० दिनांक ९.१०.२०२०.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्य शासनाने (माहिती तंत्रज्ञान विभाग) शासकीय योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांना पोहचविण्याकरिता महाडीबीटी पोर्टल विकसीत केलेले असून, सदरहू पोर्टल माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये कार्यान्वित झालेले आहे. शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ पासून संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या १४ शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे.

महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने संचालनालयाच्या /या कार्यालयाच्या विविध पत्रान्वये वारंवार लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना त्यांची शिष्यवृत्ती रक्कम महाडीबीटी व पीएफएमएस प्रणालीद्वारे थेट प्रणालीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते.

संचालनालयाच्या संदर्भिय दिनांक ११.९.२०२० रोजीच्या इमेलद्वारे या विभागामधील शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणे प्रलंबित आहे, अशा विद्यार्थ्यांची जिल्हानिहाय, महाविद्यालयनिहाय यादी येणा-या कारणांसह देण्यात आलेली आहे. ज्यामध्ये बहुतेक विद्यार्थ्यांना आधार क्रमांक त्यांचे बँक खात्याशी संलग्न नसल्यामुळे (Aadhar Number is not seeded in NPCI) शिष्यवृत्ती रक्कम जमा झालेली नसल्याचे दिसून येते.

तरी सदरहू पत्रासोबत पुन:श्च संबंधित विद्यार्थ्यांची यादी त्यांचे तपशीलासह सोबत जोडण्यात येत आहे त्या अनुषंगाने आपल्या स्तरावर तात्काळ कार्यवाही करुन शिष्यवृत्ती वितरणाबाबत येणा-या अडचणींची तात्काळ पूर्तता करण्यात यावी. जेणेकरुन संबंधित विद्यार्थ्यांच्या खात्यावर लवकरात लवकर शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होईल.

सोबत - प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी.

(डॉ. मोहन खताळ)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.